साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष  १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

● संपादक ●
**डॉ. शिवाजी हुसे**
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

**UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X**
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

**MAH MAR 34737/13/1/2009-TC**

## मूर्तिशिल्प, कला व स्थापत्य विशेषांक

वर्ष १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे

● संपादक मंडळ ●

| | | |
|---|---|---|
| डॉ. सर्जेराव जिगे | डॉ. ताहेर पठाण | डॉ. ममता इंगोले |
| डॉ. फुला बागूल | डॉ. वंदना महाजन | डॉ. वामन जाधव |
| डॉ. अनिल गर्जे | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. यशवंत सोनुने |

मूल्य : २०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1. | **प्राचीन भारतीय मूर्तिकला निर्मितीची साधने**<br>- डॉ. सीमा नवनाथ इंदलकर | 1 - 5 |
| 2. | **मार्कंडा मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास**<br>- प्रा. जयवंत एन. काकडे | 6 - 12 |
| 3. | **मराठवाड्यातील मंदिर स्थापत्यातील मूर्ती व शिल्प**<br>- डॉ. आर आर पिंपळपल्ले - सोनाळे सरस्वती निवृत्ती | 13 - 18 |
| 4. | **हेमाडपंती मंदिरांची स्थापत्य शैली**<br>- प्रा.डॉ. कोंडेकर आर. एस. | 19 - 23 |
| 5. | **अजिंठ्यातील भित्तीचित्रामध्ये दडलेला निवडक जातककथांचा नाट्यपूर्ण कथाविस्तार : एक अभ्यास**<br>- डॉ. वैशाली केशव बोदेले | 24 - 28 |
| 6. | **राजा गंधर्वसेनाच्या मूर्तीची वास्तविकता एक अभ्यास**<br>- डॉ. अस्मिता हवालदार | 29 - 36 |
| 7. | **मानसपूरी (कंधार) येथील मूर्ती शिल्पातील भव्यशिल्प : भैरव क्षेत्रपाल** - डॉ. राजाराम रा पिंपळपल्ले | 37 - 40 |
| 8. | **शिवकालीन किल्ले व किल्ले व्यवस्थापन**<br>- प्रा. डॉ. विद्यासागर पू. सोनकांबळे | 41 - 43 |
| 9. | **मुघल स्थापत्यकलेचा उत्कृष्ट भव्य नमुना - हुमायूँचा मकबरा**<br>- डॉ. अनिता शिंदे | 44 - 47 |
| 10. | **मराठेकालीन किल्ले स्थापत्यशास्त्र**<br>- डॉ. शिला कमलाकर स्वामी | 48 - 50 |
| 11. | **स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ट नमुना - किल्ले सोलापूर**<br>- श्रीमती मंजुषा कमलाकर स्वामी | 51 - 53 |
| 12. | **चलनी नाण्याचा उगम**<br>- श्री शैलेश सदाशिव सावे | 54 - 59 |
| 13. | **कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित अंतूर किल्ल्याचा अभ्यास**<br>- प्रा. डॉ. संजय वाकळे | 60 - 63 |
| 14. | **सिंधू संस्कृतीकालीन- शिल्पकला / मुर्तीकला**<br>- प्रा.डॉ.युलिसिस एकनाथ भालेराव | 64 - 67 |

| | | |
|---|---|---|
| 15. | **कंधार तालुक्यातील मानसपूरी येथील जैन मुर्ती**<br>- प्रा.डॉ.गिरे संजय भाऊराव | 68 - 71 |
| 16. | **शिल्प व स्थापत्य कलेतील वडार समाजाचे योगदान**<br>- सौ. विजयालक्ष्मी देवगोजी व डॉ. मनीषा नेसरकर | 72 - 78 |
| 17. | **बुद्धमूर्तीतील हस्तमुद्रा: एक सम्यक बोध**<br>- प्रा.डॉ. अरविंद म. पुनवटकर | 79 - 84 |
| 18. | **शिवकालीन किल्ले स्थापत्य**<br>- प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने | 85 - 88 |
| 19. | **रहस्यमय बुद्ध मुद्रा - थोडक्यात आढावा**<br>- ऐश्वर्या उमाकांत ठेंगे | 89 - 91 |
| 20. | **नृसिंहाची यक्ष परंपरा आणि त्याचा उगम...**<br>- पृथ्वीराज निलेश धवड | 92 – 98 |
| 21. | **लोकदेव क्षेत्रपाळ श्री रवळनाथ ही कथा**<br>- प्रकाश भाऊ नारकर | 99 - 104 |
| 22. | **छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यावरील श्रीगणेश**<br>- डॉ. मधुकर विठोबा जाधव | 105 - 108 |
| 23. | **वाकाटक व राष्ट्रकूटकालीन शिल्पस्थापत्य व चित्रकला : एक अभ्यास**<br>- प्रा. डॉ. सुषमा देशपांडे | 109 - 111 |
| 24. | **शिवकालीन गिरीदुर्ग स्थापत्य**<br>- प्रा.डॉ. शिल्पा शेटे | 112 - 117 |
| 25. | **मृग व्याधेश्वर मंदिराची आख्यायिका आणि वास्तविकता**<br>- डॉ. भावना श्रीपती पौळ | 118 - 121 |
| 26. | **सतीशीळा आणि सतीप्रथेचा इतिहास**<br>- श्री अनिल किसन दुधाने | 122 - 128 |
| 27. | **शिल्पकलेच्या अभ्यासासाठी डिजीटल पुनर्रुजीवन**<br>- रवीन्द्र बोरावके | 129 - 132 |
| 28. | **राणीसावरगाव येथील ऐतिहासिक स्थळाचा व हेमाडपंथीय मंदिर स्थापत्याचा अभ्यास** - डॉ. गणेश माने | 133 - 137 |
| 29. | **कंधार येथील प्राचीन बौध्द स्थापत्याचा थोडक्यात आढावा**<br>- अमोल सुदामराव श्रीखंडे | 138 - 140 |

| | | |
|---|---|---|
| 30. | **यादव कालीन नेवासा तालुक्यातील काळेगावच्या ताम्रपटाचा अभ्यास : एक दृष्टिक्षेप** - डॉ. संभाजी दराडे | 141 - 145 |
| 31. | **प्राचीन शिल्पकलेचा भारतीय वारसा**<br>- डॉ. प्रभाकर गणपत गावंड | 146 - 150 |
| 32. | **वीरगळ (वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर)**<br>- सौ सुजाता सचिन देशमुख | 151 - 154 |
| 33. | **बौद्ध धर्मिय स्थापत्य कला : स्तूप**<br>- डॉ. बाळासाहेब भिमराव अंभोरे | 155 - 159 |
| 34. | **यवतमाळ शहरातील हेमाडपंती स्थापत्य - शिवालय**<br>- कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | 160 - 164 |
| 35. | **भारतीय स्थापत्य कला शैली प्रकारांचा एक अभ्यास**<br>- डॉ. डी. डी. कोल्हेकर | 165 - 169 |
| 36. | **भारतीय कलेत शक्ती उपासना**<br>- डॉ.विवेकानंद लक्ष्मण चव्हाण | 170 - 175 |
| 37. | **वास्तुसार प्रकरणातील चित्रित बिंबपरीक्षा**<br>- महावीर सुरेश पाटील | 176 - 181 |
| 38. | **सातवाहन कालीन कला व स्थापत्य**<br>- डॉ. शिला सखाराम सहाने | 182 - 185 |
| 39. | **महायान पंथाच्या प्रसारामुळे लेणी स्थापत्यकलेवर पडलेला प्रभाव**<br>- कृष्णा अर्जुन गावित | 186 - 189 |
| 40. | **पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील स्थापत्याचा नागरी परिप्रेक्ष्यातून अभ्यास**<br>- प्रा. डॉ. मरे राजकुमार श्रीहरी | 190 - 194 |
| 41. | **मरळक येथील विमलेश्वर चे पुरातन मंदिर**<br>- लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव | 195 - 197 |
| 42. | **अंधकासुर वध दशावतार लेणे, वेरूळ**<br>- सूर्यकांत फकिरा जाधव, प्रा.डॉ. शिरीष आंबेकर | 198 - 202 |
| 43. | **भारतीय स्थापत्य समृद्धीची विविधता शोध आणि सीमा जागतीक भारतीय शिल्पकलेचा** - नंदकिशोर सैंदाणे पितांबर | 203 - 208 |
| 44. | **लातूर जिल्ह्यातील खरोसा बौध्दलेणी एक ऐतिहासिक अवलोकन**<br>- प्रा.डॉ. बालाजी मारूती गव्हाळे | 209 - 212 |
| 45. | **कंधार परिसरातील जैन सर्वतोभद्र मूर्ती** | 213 - 215 |

| | | |
|---|---|---|
| | - डॉ. चंदन एम. बावलगावे | |
| 46. | **मध्ययुगीन दक्षिण भारतातील मशिद स्थापत्य शिल्प**<br>- शेख इस्माईल महेबुब | 216 - 219 |
| 47. | **मराठवाडयातील वारकरी संप्रदाय आणि मुर्तिशास्त्राचे महत्व**<br>- दिपीका हिम्मत पवार | 220 - 222 |
| 48. | **महाराष्ट्रातील वास्तुशिल्पाचा प्रवास : प्राचीनकाळ ते मराठेशाहीपर्यंत** - Dr. Mubaraque Quraishi | 223 - 229 |
| 49. | **वज्रयान पंथातील स्त्रीप्रतीमांचे समाजशास्त्रीय विश्लेषण**<br>- कल्पना उत्तम म्हस्के | 230 - 234 |
| 50. | **पुंगळा येथील हेमाडपंती शैलीतील मंदिर**<br>- प्रा.उद्धव उमाजी राऊत | 235 - 236 |
| 51. | **गुप्तेश्वर मंदिर स्थापत्याचा अभ्यास**<br>- डॉ. कामाजी डक व प्रा. पुष्पा गायकवाड | 237 - 241 |
| 52. | **बौध्द धर्मातील बुध्दप्रतिमा व मुद्रांचा अभ्यास**<br>- सोनिया वामनराव डावरे व डॉ. शिला स्वामी | 242 - 245 |
| 53. | **रायगड जिल्ह्यातील गांधारपाले लेण्यांचा शिल्पशैलीय अभ्यास** - प्रा. डॉ. एस.व्ही पाथरकर | 246 - 249 |
| 54. | **अहमदनगर जिल्ह्यातील मंदिरे**<br>- वृषाली संजय माळी | 250 - 255 |
| 55. | **माडगीहाळ येथील प्राचीन मंदिर आणि शिल्पकृती**<br>- डॉ. सचिन शिंदे | 256 - 259 |
| 56. | **भारतीय स्थापत्यकला आणि शिल्पकला : उदय आणि विकास** - प्रा.घाडगे शंकर धारबा | 260 - 263 |
| 57. | **सिंधू संस्कृतीतील वस्त्रे**<br>- विठ्ठल लक्ष्मण फुलारे व डॉ. भेलोंडे जे. व्ही. | 264 - 266 |
| 58. | **खामगाव तालुक्यातील मध्ययुगीन शिवमंदीरे : एक चिकित्सक अध्ययन** - डॉ.किशोर मारोती वानखडे | 267 - 273 |
| 59. | **सातारा जिल्ह्यातील धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी मंदिर : मराठा स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट नमुना** - मच्छिंद्र रूपचंद चौधरी | 274 - 278 |
| 60. | **बोरगाव ता.वाळवा जि. सांगली येथील वीरगळचा इतिहास**<br>- प्रा. डॉ. चंपाताई श्रीरंग बोधले | 279 - 282 |

| | | |
|---|---|---|
| 61. | **धुळे जिल्हातील मेथी आणि बलसाणे येथील मंदिरे**<br>- डॉ. रमेश धनराज जाधव | 283-287 |
| 62. | **विष्णु मूर्ती**<br>- प्रा. गायकवाड बाळू भीमराव | 288 - 290 |
| 63. | **मौर्यकालीन स्थापत्यकला : एक चिकित्सक अभ्यास**<br>- प्रा. रविराज नामदेव कांबळे | 291 - 295 |
| 64. | **जिंजाळा किल्ल्याचे स्थापत्य - एक अभ्यास**<br>- नरसिंग रामराव चिट्टमवार | 296 - 299 |
| 65. | **मराठी स्थापत्याचे दिमाखदार रूप वाडा : स्थापत्य**<br>- श्रीमती स्नेहाली कुलकर्णी | 300 - 306 |
| 66. | **केदारेश्वर मंदिर, धर्मापुरी येथील निवडक अद्वितीय शिल्पे**<br>- श्री. मयुरेश खडके | 307 - 312 |
| 67. | **औरंगाबाद शहरातील बेगमपुरा येथील थत्ते नहर**<br>- श्रीमती धरती बालाजी येलगंटवार | 313 - 315 |
| 68. | **सातवाहन काळातील लेणी स्थापत्याचा आविष्कार**<br>- डॉ. प्रगती बी. मारकवार | 316 - 318 |
| 69. | **ब्रह्मशांती यक्ष**<br>- प्रा डॉ भानुसे के एल | 319 - 320 |
| 70. | **धर्मापूरी येथील दंतवक्रवध शिल्प– एक दुर्मीळ प्रतिमा**<br>- प्रा. डॉ. धम्मपाल माशाळकर | 321 - 324 |
| 71. | **मौर्यकालीन वास्तुकला एक अभ्यास**<br>- वाघ जालिंदर पांडुरंग | 325 - 330 |
| 72. | **मुघल स्थापत्यकला : फतेहपुर सिक्रीच्या विशेष संदर्भासह**<br>- प्रा. रुचिरा विकास दंडगव्हाळ | 331 - 335 |
| 73. | **श्री लक्ष्मीसेन जैन मठ करवीर व मानस्तंभ : एक ऐतिहासिक दृष्टीकोन** - डॉ. बाळासाहेब आमगोंडा कोटलगी | 336 - 341 |
| 74. | **ग्वाल्हेर येथील जैन शैलगृह**<br>- प्रा डॉ प्रकाश महाजन | 342 - 344 |
| 75. | **किल्ल्यांचा सामाजिक संदर्भ**<br>- डॉ.शैलेश भिमराव राऊत | 345 - 347 |

| | | |
|---|---|---|
| 76. | **औरंगाबाद शहरातील भडकल दरवाजा - स्थापत्यशास्त्रीय विवेचन**<br>- आकाश जनार्धन बोकडे | 348 - 351 |
| 77. | **किल्ले रामशेजवरील जलव्यवस्थापन**<br>- गोरख शिवाजी शेवाळे | 352 - 354 |
| 78. | **ऐतिहासिक किल्ले नळदुर्ग : जतन व संवर्धन**<br>- दादासाहेब जगन्नाथ कांबळे | 355 - 357 |
| 79. | **वेरूळ लेणीतील बौध्द स्त्री देवता**<br>- डॉ. शिरिष पवार | 358 - 360 |
| 80. | **वेरूळ बौध्द लेणीतील महामयुरीचे शिल्प**<br>- डॉ. आशोक कानडे | 361 - 362 |
| 81. | **वेरूळ बौध्द लेणीतील मनुषी बुध्द**<br>- अर्जुन गंगाराम पट्टेकर | 363 - 364 |
| 82. | **अजिंठा लेणीतील बुध्द व राहुल यांचे शिल्प**<br>- सुरेश महादेव मादळे | 365 - 367 |
| 83. | **कान्हेरी लेणीतील पद्मपाणी अवलोकितेश्वर**<br>- डॉ. सचिन बनसोडे | 368 - 369 |
| 84. | **अजिंठा लेणीतील यक्ष**<br>- डॉ. संजय पाईकराव | 370 - 371 |
| 85. | **धारकुंड येथील दुर्लक्षित लेणी**<br>- डॉ. नम्रता दिलीप भोसले | 372 - 374 |
| 86. | **सोलापूर जिल्ह्यातील दुर्लक्षित वीरगळ**<br>- डॉ. किरण काळे | 375 - 377 |
| 87. | **भामनेर मावळाला कल्याणशी जोडणारा घाटरस्ता : अंबालिक विहार आणि इतर स्थान वैशिष्टे** - गणेश फलके | 378 - 381 |
| 88. | **सांची येथील स्तूपाच्या महिला देणगीदार आणि बौद्ध धर्मातील लिंगभाव समानता** - डॉ. जगदीश छबूराव सोनवणे | 382 - 385 |
| 89. | **लेण्यातील चित्रशिल्पातून प्रतिबिंबीत समाजजीवनाचा चिकित्सक अभ्यास** - दिग्वीजय सुरेश सोनोने | 386 - 390 |
| 90. | **प्राचीन भारतीय मंदिर स्थापत्य**<br>- लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 391 - 394 |

| | | |
|---|---|---|
| 91. | **अजिंठा बौद्ध लेण्यांतील विकसीत स्थापत्य कलेचा अभ्यास**<br>- प्राची सुधाकर भोसले | 395 - 400 |
| 92. | **बोरसर येथील वाडे स्थापत्य**<br>- डॉ. टी. आर पाटील | 401 - 403 |
| 93. | **बौद्ध लेण्यातील नखशिल्पाचा चिकित्सक अभ्यास**<br>- शुभांगी राजकुमार कांबळे | 404 - 408 |
| 94. | **अजिंठा लेणीतून प्रतिबिंबीत बौध्द संस्कृती**<br>- स्नेहा सुरेश सोनवणे | 409 - 414 |
| 95. | **नांदेड जिल्हयातील कंधारच्या राष्ट्रकुटकालीन किल्ल्याचे स्थापत्य : एक अवलोकन** - डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे | 415 - 420 |
| 96. | **बौद्ध बांधीव स्तूपांवरील प्रतीकांचा अभ्यास**<br>- श्री. अमोल अशोक कांबळे व डॉ. प्रभाकर ना. कोळेकर | 421 - 428 |
| 97. | **भारतीय मूर्तिकला आणि देवी प्रतिमा**<br>- प्रा. डॉ. श्वेता बा. चौधारे | 429 - 431 |
| 98. | **नहपान विहार : सातवाहन कालीन जागतिकीकरणाचे प्रतिक**<br>- प्रा. किर्ती विकास वर्मा | 432 - 435 |
| 99. | **भारतीय कला, शिल्पकला आणि वास्तुकलेचा देशाच्या विकसात मोलाचे स्थान** - Jitendra K. Pawar & Dr. S. S. Ambekar | 436 - 440 |



# यादव कालीन नेवासा तालुक्यातील काळेगावच्या ताम्रपटाचा अभ्यास : एक दृष्टिक्षेप


**- डॉ.दराडे संभाजी सोपानराव**

इतिहास विभाग प्रमुख, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सोनई

ता.नेवासा, जि.अहमदनगर, ईमेल.:- sambhajidarade333@gmail.com


प्राचीन इतिहासाची ताम्रपट शिलालेख, आलेख, वाडे, किल्ले व तटबंदी इ. मूळ साधने महत्त्वाची असतात. या साधनांच्या आधारे प्राचीन काळातील भाषा, लिपी, समाज, धर्म, वाङ्मय आणि राजकीय स्थितीचे ज्ञान मिळण्यास मदत होते. मात्र हे ज्ञान मिळण्यास सामान्य लोकांच्या आवाक्याच्या बाहेर होते. जे काही ज्ञान होते ते ब्राम्ही लिपी मध्ये होते. ब्राम्ही लिपी चे वाचन करण्याचे तंत्र जेम्स प्रिन्सेप यांनी शोधून काढले. १९ व्या शतकामध्ये कॅनिंगहॅम, बर्जेस, जेम्स प्रिन्सेप इत्यादी ब्रिटिश संशोधकांनी दळणवळणाच्या साधनांचा अभाव असताना ठग, पेंढारी, दरोडेखोर यांचा त्रास असताना देखील तत्कालीन भारतातील विविध भागात जाऊन प्राचीन भारताच्या इतिहासाचे ज्ञानभांडार शोधून काढले. यावर अधिक सखोल संशोधन व्हावे यासाठी ब्रिटिशांनी स्वतंत्र पुरातत्त्वविद्या शाखा सुरू केली. या शाखेच्या माध्यमातून विविध शिलालेख, ताम्रपट यांचा अभ्यास होऊ लागला. या अभ्यासाचे महत्त्व ओळखून ब्रिटिश सरकारने इ.स. १८८८ मध्ये 'एपिग्राफिया इंडिका'[१] हे नियतकालिक सुरु केले.

ताम्रपटांवरील कोरीव लेखांचा अभ्यास पुराभिलेखविद्या या शाखेत केला जातो. प्राचीन काळातील लोक अखंड शिळा, धातू, स्तंभ, धातूंचे पत्रे, प्रस्तर, विटा, भांडी, मुद्रा इ. वस्तूंवर लेख कोरीत असत. या लेखावर एखादा शब्द,खूण, नाव असते. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी एखादा यात्रेकरू गेला तर त्या ठिकाणी तो आपले नाव स्तंभावर, दगडावर अथवा भिंतीवर कोरतो. तसेच आसनपट्टी व सतीलेख या ठिकाणी ही असे उल्लेख दिसून येतात. कोरीव लेखांचे राज्यकर्त्यांनी लिहिलेले लेख व खाजगी व्यक्तींनी अथवा संस्थांनी लिहिलेले लेख असे दोन प्रकार आढळून येतात. त्यातून पुढील पिढ्यांना माहिती मिळते म्हणूनच प्राचीन व मध्ययुगीन काळातील भारतीय इतिहासामध्ये कोरीव लेखांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसते. अशा लेखातील मजकूरांमुळे इतिहासात मौल्यवान भर पडत असते. मुघल

काळापर्यंत कोरीव लेखांचे वाचन होऊ शकले नाही. परंतु ब्रिटिशांच्या सनदी नोकरांमुळे भारतीय इतिहासाचे वैभव पुढे येण्यास मदत झाली. सर विल्यम जोन्स यांनी प्राचीन अवशेषांचा अभ्यास करण्यासाठी 15 जानेवारी १७८४ मध्ये 'एशियाटिक रिसर्चस' हे नियतकालिक सुरु केले. या नियतकालिकांमधून नाणी, शिल्प, शिलालेख, ताम्रपट इत्यादींचे लेख प्रसिद्ध होऊ लागले.

**उद्दिष्टे :-**

- यादव काळातील महाराष्ट्रातील परिस्थिति आणि नेवासे तालुक्यातील काळेगाव येथील ताम्रपटाचा अभ्यास करणे.
- प्राचीन व मध्ययुगीन भारतीय इतिहासाचे वैभव व महत्त्व जाणून घेणे.
- यादव घराण्यातील पराक्रमी राजांची कारकिर्द अभ्यासणे.
- तत्कालीन सामाजिक,आर्थिक,राजकीय व प्रशासकीय जीवनाची माहिती अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधातून वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे . या संशोधन अभ्यासामध्ये प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करुन इतिहासाचे नव्याने परिशीलन करण्यात आले आहे . वर्णनात्मक आराखडा म्हणजे साधनसामग्रीच्या आधारे ईतिहासाचे वस्तुनिष्ठ वर्णन करणे होय. असे वर्णन करताना प्राचीन व मध्ययुगीन काळातील पुरातत्वीय साधने, वृत्तपत्रातील लेख तसेच प्रत्यक्ष क्षेत्र भेट याबरोबरच आशय विश्लेषण इत्यादी तंत्राचा वापर करून प्रकाशित साहित्याचा पडताळा घेण्यात आला आहे.

साधनांची जुळणी व तपासणी करताना मूळ कागदपत्रे शोधून त्या आधारे सत्यशोधन करण्यावर भर देण्यात आला आहे . प्रत्यक्ष क्षेत्र भेट देऊन व संग्रहालयातील माहिती संकलित आधारे मांडणी करण्यात आली आहे.

**ताम्रशासनाचे स्वरूप :-**

ताम्रपट हे इतिहासाचे प्रमुख अंग असते त्यातील लेखांमुळे आपल्याला तत्कालीन विविध घटनांची माहिती मिळते. राजवंशाच्या वंशावळी, भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इ. प्रकारची माहिती मिळते. ताम्रपटामध्ये काही दोषही असू शकतात. मात्र प्राचीन लेखन साधनांमध्ये ताम्रपट हे सर्वात लोकप्रिय साधन दिसून येते. ताम्रपट हे राजा, त्याचे अधिकारी, देव अगर ब्राह्मण यांना दान दिले जात असायचे त्यास ताम्रशासन, दानशासन व ताम्रपट असे म्हटले जात होते. देवास दिलेल्या दानास 'देवदाय' तर ब्राम्हणास दिलेल्या दानास 'ब्रह्मदाय' असे म्हटले जात होते. वाकाटक राजा दुसरा विंध्यशक्ती याचा वाशीम येथील ताम्रपटाचा उल्लेख केला जातो. ताम्रपट लिहिण्यापूर्वी अगोदर त्यातील मजकूर लाकडी फळीवर खडूने लिहीला जात असे. त्यानंतर तो करणीक बरोबर ताम्रपटावर कोरून काढीत असे . ताम्रपटावर कोरण्याचे कार्य व्यवस्थित होते की नाही हे पाहण्यासाठी 'अक्षयपटलीक' या अधिकाऱ्याची नेमणूक केली जात होती. कोरणाऱ्या मजकुराला 'उत्किर्ण' असा शब्दप्रयोग प्रचलित होता. ताम्रपट व्यवस्थित ठेवण्यासाठी घरातील भिंती, कोनाडे, दगडी पेटीत ठेवले जाते असे. यादवराजा महादेव याचा काळेगावयेथे सापडलेला ताम्रपट दगडी पेटीमध्ये आढळून आलेला आहे.[२]

ताम्रपट हे बहुतांशी लांबट चौकोनी होते. सुरुवात, मध्य व शेवट अशा प्रकारे तीन टप्प्यात लिहिलेला जात असे. ताम्रपटाच्या चारही बाजूच्या कडा वर उचललेल्या असल्यामुळे त्यातील अक्षरे झीजत नव्हते. पहिल्या पत्र्याच्या आतील बाजूवर,मधल्या पत्र्याच्या दोन्ही बाजूंवर तर तिसऱ्या पत्र्याच्या आतील बाजूवर मजकूर कोरलेला जात होता. या पत्र्यांच्या डाव्या बाजूला गोल छिद्र पाडून ती कडीमध्ये गोवलेली असत. सदर कडीची दोन्ही टोके एकत्र करून त्यावर राजमुद्रा कोरली जात होती . मुद्रा पंचधातूची किंवा तांब्याची असे. ताम्रपटाचा सुरुवातीला सिद्दम, दृष्टम,

स्वस्तिक, ॐ इ. मांगल्यसूचक शब्द वापरले जात होते. ताम्रपटावर स्थानाचे नाव, वंशावळ, पराक्रमाचे वर्णन, चतु:सिमा, गोत्र, वास्तव्य, कालगणना, राज्यकाल, तिथी इ. नोंदी असतात.

**यादव राजा महादेव यांचा काळेगाव येथील ताम्रपट शके ११८२**

महाराष्ट्रातील यादव घराणे मध्ययुगीन काळात एक इतिहास प्रसिद्ध राजघराणे होते . यादव घराण्याची महाराष्ट्र व त्या लगतच्या प्रदेशावर पाचवा भिल्लम (११८५-११९३) याच्या कारकीर्दीपासून यादव घराण्याच्या ह्रासापर्यंत(इ.स.1318) आधी सत्ता होती . या घराण्यातील राजे सुरवातीला राष्ट्रकूटांचे मांडलिक होते . तर पुढे दुसऱ्या भिल्लमाच्या कारकिर्दीत (इ.स.975-1005) ते चालुक्यांचे (कल्याण) मांडलिक होते . या घराण्याची माहिती त्यांच्या पुराभिलेखातून आणि हेमाद्री लिखित चतुर्वर्ग चिंतामणी ग्रंथांच्या व्रतखंडातून मिळते. यादव राजे स्व:ताला श्रीकृष्णाचे वंशज म्हणवून घेत असतं .

हा ताम्रपट अहमदनगर जिल्ह्यातील गोदावरी नदीच्या किनारी असलेल्या काळेगाव येथे सापडला आहे. सदर गाव नेवासा या तहसील पासून साधारणपणे २४ कि.मी. अंतरावर आहे. काळेगाव मध्ये जुने वाडे, चौथरे, गढया इ. प्राचीन अवशेष आहेत. येथील ताम्रपट २२ सप्टेंबर १९५५ मध्ये पावसामुळे गावातील रस्त्यावरील माती वाहून गेली आणि तेथे कापीव दगड दिसू लागला म्हणून येथे खोदण्याचे काम केल्यावर एक दगडी पेटी दिसून आली. त्यामध्ये एका कडी मध्ये तीन पत्रे ओवलेले दिसून आले. सदर दगडी पेटीची लांबी ५५ सेंमी, रुंदी ३२ सेंमी आणि उंची १५ सेंमी असून १.३२ मीटर उंचीचा खोलगट भाग होता. त्या पेटीत सापडलेल्या पत्र्याची जाडी ०.०५ सेंमी, लांबी ३८ सेंमी व रुंदी २७ सेंमी असून वजन अनुक्रमे ३.६५ किलो, ३.८०किलो आणि ३.३० किलो आहे. पत्र्यावरील मजकूर सुरक्षित राहण्यासाठी पत्र्यांच्या कडा वर उचललेल्या आहेत. या ताम्रपटासंबंधीलेख डी.जी. कोपरकर यांनी 'एपिग्रफिया इंडिका' खंड ३२, पृष्ठ ३१ मध्ये प्रसिद्ध केला आहे.[३]

**मुद्रा :-**

या ताम्रपटाच्या मुद्रेवर गरुड असून तो बसलेला दाखवून त्याचे हात जोडलेले आहे व पंख पसरले आहेत. मूर्तीची उंची ११ सेंमी आणि १० सेंमी रुंदीचे आहे. त्याचे वजन ६७८ ग्रॅम आहे. कडीचा व्यास ३० सेंमी असून वजन २५८ ग्रॅम आहे.

**भाषा :-**

काळेगाव येथील ताम्रपटाची भाषा संस्कृत व देवनागरी आहे. तत्कालीन संस्कृत भाषेला जास्त महत्त्व होते. 'र' नंतर आलेल्या व्यंजनांचेद्वित्व झालेले आढळून येते. काही ठिकाणी 'श' बद्दल 'स' हे अक्षर वापरलेले दिसून येते.

**लिपी आणि वर्णव्यवस्था :-**

ताम्रपटाची लिपी १३व्या शतकातील देवनागरी असून तिच्यामध्ये पृष्ठमात्रेचा उपयोग केला आहे.व,ब,द, आणि ड, थ, ध, स्थ, च्छ, ब्द,व्द,व्य,ध्य या अक्षरांची परस्पर अदला बदल झालेली दिसून येते. काही वेळा 'प' या अक्षरातील दंड खाली वळल्यामुळे 'प' हे अक्षर 'ए' प्रमाणे दिसते. अनुस्वार पोकळ चिन्हाने दाखवलेला आहे.

**कालनिर्देश :-**

ताम्रपटातील तिसाव्या पदयानंतर गद्य भागात ताम्रपटाचा कालनिर्देश आला आहे. गतशतकाल ११८२ दुर्मति संवत्सर, भाद्रपद महिना, शुक्ल पक्ष द्वितीया म्हणजेच इ.स. २९ ऑगस्ट १२६१ .

**स्थलनिर्देश :-**

महादेव राजाने दान दिलेल्या काळेगाव या गावाच्या सीमा ताम्रपटात दिल्या आहेत. काळेगावाच्या उत्तरेस गोदावरी नदी, पश्चिमेस खामगाव, नाईगाव निबंरविम्ही गावे पूर्वेस, रांजणगाव व दहिगाव दक्षिणेस. सध्याचे निंभारी गाव

हे काळेगाव  पासून पूर्वेस तीन किलोमीटर अंतरावर आहे. सध्याचे दहिगाव आणि रांजणी ही गावे काळेगावच्या दक्षिणेस सहा किलोमीटर अंतरावर आहेत. ही दोन्ही गावे ताम्रपटात उल्लेखली आहेत. काळेगावच्या पश्चिमेस पाच किलोमीटर अंतरावर खामगाव हे गाव आजही आहे. तेच ताम्रपटातील खामगाऊ असावे.[४]

काळेगावच्या पश्चिमेस सहा किलोमीटर अंतरावर वरखेड हे जुने गाव आहे. त्याठिकाणी ऋग्वेदी, वासिष्ठ, विश्वामित्र, जमदग्नी गोत्राची ब्राह्मण कुटुंबे राहतात. सदर ताम्रपटात या गोत्राचे ऋग्वेदी ब्राह्मण आहेत. वरखेड हे तत्कालीन प्रसिद्ध ज्ञानपीठ होते. येथे नागेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. बहुतेक हेच पूर्वी नऊगाव असावे. 'मुहूर्त चिंतामणी' या ग्रंथात राज्याभिषेकाच्या मुहूर्ताविषयी सखोल माहिती दिली आहे. सोमवार, शुक्रवार व रविवार या दिवशी राज्याभिषेक करावा. तर मंगळवार व बुधवार या दिवशी राज्याभिषेक टाळावा. उत्तरायणात राज्याभिषेक करावा. चैत्र, आषाढ व अधिक मास टाळावा. श्रावण, भाद्रपद महिने व चतुर्थि, नवमी, चतुर्दशी व अमावस्या या दिवशी राज्याभिषेक करू नये. प्रत्येक महिन्याची वद्य प्रतिपदा शुभकार्यास योग्य नाही. राज्याभिषेक करण्यासाठी सूर्य वृश्चिक, तुला किंवा कन्या राशीत असेल तर चांगले राहील. 'पिळळे' यांच्या कालगणनेप्रमाणे २९ ऑगस्ट १२६१ ला सूर्य कन्या राशीत होता. त्या अगोदर दोन दिवसापूर्वी अधिक भाद्रपद महिना संपलेला होता. भाद्रपद महिना व दक्षिणायन या दोन्ही गोष्टी नियमाविरुद्ध आहेत. परंतु राज्याचे अनपेक्षित निधन झाले तर राजाविना राज्य राहू नये याचाही नियम 'मुहूर्त चिंतामणी' मध्ये सांगितला आहे. यादव राजा कृष्ण याच दरम्यान मरण पावल्यामुळे त्याचा धाकटा भाऊ महादेव सत्तेवर आला.

**सारांश :-**

हा ताम्रपट यादवराजा महादेव यांच्या राज्याभिषेक प्रसंगी दिलेला आहे. राजा महादेव यांची कारकीर्द सुख-समृद्धीची व्हावी आणि राज्याचा विस्तार व्हावा या हेतूसाठी मंगल प्रसंगी ५२ ब्राह्मणांना 'कालुगाव' म्हणजेच काळेगाव दान दिल्याचा उल्लेख आहे. या दान दिलेल्या गावाचे नाव नंतर 'पटवर्धनपुर' असे करण्यात आले होते.[५] या गावातील सर्व हक्क ब्राह्मणांना मिळाले होते. या गावाचे दान घेणारे ५२ ब्राह्मण २२ गोत्राचे होते. ५२ पैकी ३० ऋग्वेद, २१ यजुर्वेद, १ सामवेदी ब्राह्मण होते. सदर ताम्रपटात ब्राह्मणांना एकूण अकरा हक्क देण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे,

१) निधी - भुम्यन्तर्गत निधी
२) निक्षेप - जमिनीवरील
३) जल – पाण्यातील
४) पाषाण – खनिज
५) दंड - दंडरुपाने मिळालेले पैसे
६) दान - आयात-निर्यात कर
७) कारुक - कलाकारांवर बसवलेला कर
८) मौलिक - परंपरागत असलेला कर
९) श्रोत्र - सर्व तऱ्हेच्या वस्तूंवरील कर

वरील सर्व करांचा उल्लेख ताम्रपटात आलेला आहे.

**ताम्रपटात विविध गावांचा उल्लेख :-**

१) कालुगाव - ज्या ठिकाणी ताम्रपट सापडला ते काळेगाव
२) नींबरवी - काळेगावच्या पूर्वेस असलेले लिंबोरी किंवा निंबारी
३) दहींगौ - काळेगावच्या दक्षिणेस ४ मैलांवर दहिगाव
४) रांजणगौ - काळेगावच्या दक्षिणेस ४ मैलांवरील रांजणगाव
५) खांभगौ - काळेगावच्या पश्चिमेस ३ मैलांवरील खामगाव
६) नाईगौ - काळेगावच्या पश्चिमेस ४ मैलांवरील वरखेड असावे
७) सेऊणदेश

**निष्कर्ष :-**

यादव काळातील सर्वच राजे वैदिक संस्कृतीचे अभिमानी आणि विद्या व कला यांचे भोक्ते होते. तत्कालीन समाजव्यवस्था धर्माधिष्ठित होती. यादव राजा महादेव यांच्या काळेगाव ताम्रपटातून पहिल्या तीस पद्यात यदुकुलोत्पन्न राजांच्या पराक्रमाचे वर्णन आहे. यादव कुळाचा उदयाचा वृत्तांत दिलेला आहे. सुरुवातीस यादव राजे कल्याणीच्या चालुक्यांचे मांडलिक होते. यादव राजांच्या पदवी व उपाधी यांच्या विषयी माहिती मिळते. यादव राजांनी चालुक्य, काकतीय, गुजरात, कोकणच्या शिलाहारांचा पराभव केल्याचे दिसून येते.

यादवांचा राजा महादेव याने आपल्या राज्याभिषेकप्रसंगी ५२ ब्राह्मणांना काळेगाव हे गाव दान दिल्याचे ताम्रपटातून स्पष्ट जाणवते. सदर ताम्रपटातून काळेगावची चतु:सीमा कोणत्या आहेत याचा बोध होतो. सदर ताम्रपटातून तत्कालीन राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक इ. गोष्टी समजण्यास मदत होते.[६] त्याचबरोबर काळेगावातील सर्व प्रकारचे कर गोळा करण्याचे हक्क दान घेणाऱ्या ब्राह्मणास मिळत होते म्हणजे तत्कालीन करप्रणाली अथवा आर्थिक बाबींची माहिती समजण्यास मदत होते. थोडक्यात प्राचीन व मध्ययुगीन काळातील पुरातत्वीय साधनांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.[७] त्यासाठी भारत सरकारने व राज्य सरकारने ऐतिहासिक वस्तू संग्रहालये यांना भरघोस मदत करावी. नाहीतर महाराष्ट्रातील इतिहास संशोधनाची दुरावस्था झाल्याशिवाय राहणार नाही. अहमदनगर वस्तुसंग्रहालयाचे संचालक राहिलेले स्व. सुरेश जोशी समाजास व प्रशासनास निर्वाणीचे इशारे देत होते की ‘आपल्या संस्थेस मदतीचा हात मिळाला नाही तर त्यांची वस्तुसंग्रहालय बंदच करावे लागेल.[८] या घटना इतिहास संशोधक क्षेत्रातील दुरवस्थेचा निर्देशक आहे.’इतिहासांच्या साधनांचे जतन करण्यासाठी वस्तुसंग्रहालये यांना अनुदान स्वरुपात मदत केली पाहिजे. ऐतिहासिक अवशेष किल्ले यांचे संवर्धन करून पायाभूत सुविधा दिल्यास मोठ्या प्रमाणात पर्यटन वाढून तरुणांना रोजगाराच्या संधि उपलब्ध होतील.

**संदर्भ ग्रंथ सूची : -**


- गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, म.रा. विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपुर, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे . १९७५.
- वि.भी.कोलते, लीला चरित्र, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंत्रालय, मुंबईप्रथम आवृत्ती, सप्टेंबर १९७८.
- उपरोक्त,गोखले शोभना.
- सु.ग.पानसे, यादवकालीन महाराष्ट्र, मुंबईमराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई १९६३ .
- शांताराम भालचंद्र देव, महाराष्ट्र व गोवा शिलालेख, ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९८४.
- डॉ. जयसिंगराव पवार,आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली,२००४.
- म.श्री.माटे प्राचीन कला भारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे,१९९८.
- सु.ह.जोशी, भ.रा. कुलकर्णी, इतिहास माहिती कोश, डायमंड प्रकाशन,पुणे,२००९.
- Annual Report of the Archaeological Survey if India.


◆◆◆◆

